# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**<u>प्रसिद्धी</u>**

**पत्रक**

**ता. २३ जानेवारी २०१९**

# रेणूका आवर्तन मंडळाच्या सदस्यांना ‘स्वच्छता मित्र’चे ओळखपत्र प्रदान

**नागपूर, ता. २३ :** स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ सर्वेक्षण २०१९ मध्ये आपल्या नागपूर शहराने सहभाग घेतला आहे. आपले शहर स्वच्छ, सुंदर व्हावे, कचऱ्याचे योग्य विलगीकरण, योग्य विल्हेवाट लावण्यात यावी यासाठी विविध संस्था पुढाकार घेउन ‘स्वच्छता मित्र’ बनत आहेत. याच उपक्रमांतर्गत बुधवारी (ता. २३) महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते सोनेगाव येथील रेणूका आवर्तन मंडळाच्या सदस्यांना ‘स्वच्छता मित्र’चे ओळखपत्र प्रदान करण्यात आले.

महापौर कक्षामध्ये आयोजित कार्यक्रमात महापौर नंदा जिचकार यांनी सर्व मंडळाच्या लक्ष्मी जोशी, माया हाडे, अरविंद हाडे, संगीता तेलंग, साधना बरबडे, रमा कठाळे, विणा होटे यांना ‘स्वच्छता मित्र’चे ओळखपत्र प्रदान केले.

यावेळी महापौर नंदा जिचकार यांनी सर्व ‘स्वच्छता मित्रां’चे अभिनंदन केले. स्वच्छता ही आपली नैतीक जबाबदारी आहे. आपले घर जसे आपण स्वच्छ ठेवतो तसेच आपला परिसर व आपले शहरही नियमीत स्वच्छ राहावे यासाठी प्रत्येकाने जनजागृती अभियानात सहभागी होण्याचे आवाहन यावेळी महापौर नंदा जिचकार यांनी केले.